ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात रामराव पवार यांचे योगदान

डॉ. अनिल मुरलीधर कठारे
प्रोफेसर, विभाग प्रमुख व संचालक , पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र,
श्री शिवाजी कॉलेज, कंधार , जि. नांदेड.

***प्रस्तावना :***



रामराव नामदेव पवार हे जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक असून ते कंधार येथील रहिवाशी आहेत. त्यांनी हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात मोठे योगदान दिले आहे. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाचे नेतृत्व हैदराबाद स्टेट काँग्रेसने केले. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या नेतृत्वाखाली झालेल्या सत्याग्रहात रामराव पवार यांनी सहभाग नोंदविला. ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतात जवळपास ५६३ देशी राज्य आणि संस्थाने होती. या राज्याचा आणि संस्थानाचा राज्यकारभार देशी राजे व संस्थानिक पाहात असत. दक्षिण भारतात त्रावणकोर, बडोदा, कोल्हापूर, नागपूर आणि हैदराबाद ही तीन राज्ये होती. यामध्ये हैदराबादचे राज्य आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे होते, म्हणून ते महत्त्वाचे होते. मोगल सम्राट औरंगजेब २० फेब्रुवारी १७०७ रोजी मरण पावले. त्यांच्यानंतर सत्तेवर आलेले मोगल सम्राट दुर्बल व कर्तृत्वहीन निघाले. याचाच फायदा घेऊन दक्षिणेचे सुभेदार मीर कमरुद्दीन चिन कूलीज खान निजाम उल मुल्क यांनी ३१ जुलै १७२४ रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. या राज्याची राजधानी हैदराबाद होती. या राज्याच्या गादीवर वंशपरंपरेने होऊन गेलेल्या सत्ताधिशांना निजाम व आसफजाह या नावाने ओळखले जात असे. हैदराबाद राज्यात मराठवाडा, तेलंगण व कर्नाटक या प्रादेशिक विभागांचा समावेश होता.

**हैदराबाद राज्याची स्थापना :**

मोगल काळात दख्खनची ( दक्षिण भारत ) विभागणी प्रशासनाच्या सोयीसाठी खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद, बीदर, विजापूर आणि हैदराबाद या सहा सुभ्यांत करण्यात आलेली होती. औरंगाबाद हे या सुभ्यांच्या कारभाराचे मुख्यालय होते. या सहा सुभ्यांचा कारभार पाहण्यासाठी एका सुभेदाराची नियुक्ती मोगल सम्राटाकडून केली जात असे. त्यालाच दक्षिणेचे सुभेदार असे संबोधिले जाई. मोगल सम्राट फर्रुखशियर याने इ.स. १७१३ मध्ये मीर कमरुद्दीन निजाम उल सुल्क फिरोजजंग खान खानान चिन कुलीजखान याची दक्षिणेचा सुभेदार म्हणून नियुक्ती केली. औरंगजेब या मोगल सम्राटाच्या मृत्युनंतर सत्तेवर आलेले मोगल सम्राट दुर्बल निघाले. तसेच सत्तेसाठी त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांत संघर्ष सुरु झाले. त्यामुळे देशात राजकीय अस्थिरता निर्माण झाली. त्याचाच फायदा घेऊन दख्खनचे सुभेदार मीर कमरुद्दीन यांनी ३१ जुलै १७२४ रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. या राज्याची पहिली राजधानी औरंगाबाद होती. नंतर ती हैदराबाद येथे स्थलांतरीत केली. मीर कमरुद्दीन यांस मोगल सम्राट महम्मदशहा यांनी आसिफजाह हा किताब दिला होता. त्यामुळे त्यांच्या घराण्यास आसिफजाह ( आसफजाही, आसफिया, आसिफजाही ) घराणे असे संबोधण्यात आले.

**भौगोलिक स्थान व क्षेत्रफळ :**

हैदराबाद राज्य हिंदूस्थानच्या आणि दख्खनच्या जवळपास मध्यभागी वसलेले होते. या राज्याचे भूक्षेत्रफळ ८२६९८ चौ. मै. असून हे राज्य १५° १° आणि २०° ४° उत्तर अंक्षास व ७४° ४° व ८१° ३५° पूर्व रेखांस वसलेले होते. हिंदूस्थानात असलेल्या देशी राज्यात काश्मिरचे राज्य आकाराने सर्वात मोठे होते. तर हैदराबाद राज्य आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे होते. काश्मिरचे भूक्षेत्रफळ ८४,७४१ चौ. मै. होते. हैदराबाद राज्यात मराठवाडा, तेलंगण व कर्नाटक या तीन प्रदेशांचा समावेश होता. या प्रदेशांचे भूक्षेत्रफळ व १९४१ च्या शिरगणतीनुसार लोकसंख्या[१] पुढीलप्रमाणे होती.

| | प्रदेशाचे नाव | भूक्षेत्रफळ | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १. | मराठवाडा | २७,५९१ चौ.मै. | ८६३५१३१ |
| २. | तेलंगण | ४१,५०२ चौ.मै. | ५२१९५२८ |
| ३. | कर्नाटक | १३६०५ चौ. मै. | २३,३९,६६४ |

**हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम म्हणजे काय ?**

१८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिशांनी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास केला. या कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत ब्रिटिशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला. म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळाले. वरील कायद्यानुसार देशी राज्ये आणि संस्थानिकांनाही त्यांनी आपले राज्य भारतात की पाकिस्तानात

विलीन करावयाचे की, स्वतंत्र रहावयाचे या बाबतीत स्वातंत्र्य दिलेले होते. त्यामुळे देशी राज्ये व संस्थाने भारतीय संघराज्यात कशी विलीन करुन घ्यावयाची हा मोठा प्रश्न भारत सरकारपुढे निर्माण झाला. शेवटी भारताचे पंतप्रधान पंडित नेहरु व गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी बहुतेक संस्थाने भारतात विलीन करुन घेतली. परंतु हैदराबाद राज्याचे सत्ताधिश निजाम मीर उस्मान अली खान यानी ११ जुन १९४७ रोजी आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहिर केले.

निजामाने आपले राज्य स्वतंत्र रहाणार असल्याचे घोषित केल्यामुळे भारत सरकार आणि हैदरबाद राज्यातील जनतेपुढे मोठा पेच व प्रश्न निर्माण झाला. हैदराबाद राज्याचे सत्ताधिश मुसलमान होते. परंतु राज्यात ७० टक्के हिंदु, १८ टक्के दलित, ११ टक्के मुसलमान आणि १ टक्का इतर लोक होते. तसेच निजामाची सत्ता अन्यायी, अत्याचारी होती. याशिवाय देशाच्या व दखखनच्या मध्यभागी असलेले आणि देशात आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे असलेले हैदराबाद राज्य स्वतंत्र रहाणे राज्यातील जनतेच्या नव्हे तर देशाच्याही हिताचे नव्हते. तसेच हैदराबाद राज्याच्या भारतातील विलिनीकरणाशिवाय भारताच्या स्वातंत्र्याला पूर्णत्व प्राप्त होणार नव्हते. त्यामुळे राज्यातील जनतेने हैदराबाद राज्याचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्यासाठी सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले. शेवटी १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई करुन ते भारतीय संघराज्यात विलीन करुन घेतले. हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी जनतेने जे सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले, हेच आंदोलन भारतीय इतिहासात हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम या नावाने ओळखले जाते. हा स्वातंत्र्य-संग्राम भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचाच एक भाग होता. तसेच हा स्वातंत्र्य संग्राम महात्मा गांधीजींच्या मार्गदर्शनानुसारच यशस्वी झाला.

**हैदराबाद स्टेट कॉंग्रेसची स्थापना :**

हैदराबाद राज्यातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी एक राजकीय व्यासपीठ असणे आवश्यक होते. याच हेतूने स्वामीजींच्या प्रेरणेने व महाराष्ट्र परिषदेच्या पुढाकाराने इ.स. १९३७ साली कर्नाटक परिषद, आंध्र महासभा व महाराष्ट्र परिषदेचे एकीकरण झाले. त्यासाठी या तिन्ही परिषदांच्या प्रतिनिधींची संयुकत बैठक महाराष्ट्र परिषदेच्या वतीने हैदराबादला झाली होती. लातूरच्या महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाच्या आदेशानुसार स्वामीजी अंबाजोगाई सोडून हैदराबादला[२] राहण्यासाठी गेले. तेथे रंगराव मुन्सफ उर्फ रंगराव रत्नाळीकर यांच्या एका खोलीत स्वामीजी राहू लागले. परंतु तेथील एकाही नावाजलेल्या पुढाऱ्यांनी त्यांना आधार दिला नाही. स्वामीजीबरोबर आनंद वाघमारे व दिगंबरराव बिंदूही असत. संपूर्ण हैदराबादसाठी एक राजकीय संघटना कायम झाली पाहिजे हा त्यांचा विचार होता.

याच सुमारास हैदराबादमधील नेत्यांनी २९ जून १९३८ रोजी हैदराबाद येथे काशीनाथराव वैद्य यांच्या घरी एक बैठक घेऊन हैदराबाद स्टेट कॉंग्रेस या संघटनेची स्थापना केली. या बैठकीस स्वामीजींना व आंध्र मराठवाड्यातील जहाल नेत्यांना मात्र बोलाविण्यात आलेले नव्हते. या बैठकीतील सर्व नेते मवाळ विचारसरणीचे व सरकारवर विश्वास ठेवणारे होते. याच बैठकीत एका अस्थायी समितीची निवड करण्यात येऊन तिचे संयोजकत्व रामकिशन धूत यांच्याकडे दिले. या अस्थायी समितीचे सभासद म्हणून पांडूरंगराव जोशी, जी. रामाचारी, हनुमंतराव माडपाटी, सय्यद सिराजल, हसन तिरमिजी व बी. रामकृष्णराव यांची निवड करण्यात आली होती. या समितीने नंतर श्रीधर वामन नाईक, हरिलाल वाघरे, रविनारायण रेड्डी, गोविंदराव नानल, हरिशचंद्र हेडा व जनार्दनराव देसाई यांना सदस्य म्हणून संलग्न करुन घेतले. याच बैठकीत असेही ठरविण्यात आले की, ९ सप्टेंबर १९३८ रोजी सभासदांची आमसभा घ्यावी व त्यामध्ये कार्यकारी मंडळाची रीतसर निवड करावी. ही आमसभा हैदराबाद शहरात जी. रामाचारी यांच्या बंगल्यावर होणार होती. याच आमसभेत स्टेट कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळाची रीतसर निवड करण्यात येणार होती. दरम्यानच्या काळात सदस्य नोंदणी करण्यात आली. जी. रामाचारी हे सरकारचे विश्वासू, असल्याने त्यांना विचारल्याशिवाय सरकार स्टेट कॉंग्रेसच्या विरोधात काहीही करणार नाही, अशी मवाळ नेत्यांची भ्रामक कल्पना होती. परंतु सरकारने स्टेट कॉंग्रेसची रीतसर स्थापना होण्यापूर्वीच ८ सप्टेबर १९३९ रोजी सरकारने पब्लीक सेफ्टी रेग्युलेशन या कायद्याने कॉंग्रेसच्या स्थापनेवर बंदी घातली. जी रामाचारी यांच्या बंगल्यावर ९ सप्टेबर १९३८ रोजी हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या स्थापनेची घोषणा करण्यासाठी जी आमसभा बोलाविण्यात आली होती, ती आमसभाच बेकायदेशीर[३] असल्याचे सरकारने कॉंग्रेसच्या अस्थायी समितीला कळविले. येथूनच पुढे हैदराबाद स्टेट कॉंग्रेसने हैदराबाद निजाम सरकारच्या विरोधात सत्याग्रहाचे पर्व सुरु केले. स्टेट कॉंग्रेसने इ.स. १९३८, इ.स. १९४२, इ.स. १९४७ आणि इ.स. १९४८ मध्ये निजामाच्या विरोधात आंदोलन केले. यामध्ये १९४२ चे आंदोलन, झेंडा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन उल्लेखनीय ठरते. या सत्याग्रहात पवार रामराव नामदेव यांचे योगदान महत्त्वाचे ठरते.

**झेंडा सत्याग्रह - १९४७ :**

३ जुलै १९४६ रोजी सरकारने हैदराबाद स्टेट कॉंग्रेस[४] वरील बंदी उठविली. त्यानंतर कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन हैदराबाद शहरात मुशीराबाद भागात १६,१७ व १८ जून १९४७ रोजी भरले. या अधिवेशनात कॉंग्रेसची कार्यकारीणी जाहिर केली. स्वामीजींची अध्यक्ष म्हणून व जे.के. प्राणेशाचार्य यांची सरचिटणीस पदावर निवड झाली. या अधिवेशनात लोकांना अंतिम लढ्यासाठी आवाहन कराणारा ठराव बी. रामकृष्णराव यांनी मांडला व त्यास दिगंबरराव बिंदूनी अनुमोदन दिले. ११ जून १९४७ रोजी निजामाने आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहिर केले. त्यामुळे स्टेट कॉंग्रेसने स्वामी रामानंद तीर्थांच्या नेतृत्वाखाली पून्हा स्वातंत्र्य -लढ्याला सुरुवात केली. त्यांनी आता कायदेभंगाच्या चळवळीला प्रारंभ केला. ७ ऑगस्ट १९४७ हा दिवस संघराज्यात विलीन होण्याचा दिन[५] आणि १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस भारतीय स्वातंत्र्य दिन[६] म्हणून साजरा करण्याचे स्टेट कॉंग्रेसने ठरविले. तसेच या दिवशी भारताचा तिरंगा ध्वज फडकावून सत्याग्रह करण्यात येणार होता. भारतीय घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद, हंगामी सरकारचे पंतप्रधान पंडित नेहरु, उपपंतप्रधान सरदार पटेल, अखिल भारतीय संस्थानी प्रजा परिषदेचे अध्यक्ष डॉ. पट्टाभि सितारामय्या व निजाम यांना तार व रजिस्टर्ड पत्रे पाठवून हैदराबाद राज्याने तात्काळ भारतीय संघराज्यात सामील होण्याची मागणी करावी असेही स्टेट कॉंग्रसने ठरविले होते. कार्यकारीणीच्या निर्णयानुसार १५ ऑगस्ट१९४७ रोजी प्रत्येकाने आपल्या घरावर तिरंगा ध्वज लावावा व झेंडा सत्याग्रह करावा असे आवाहन स्वामीजींनी जनतेला केले होते. इकडे निजामाने मात्र तिरंगा ध्वज फडकावण्यास बंदी घातली होती. ७ ऑगस्ट १९४७ पासून हैदराबाद राज्यात झेंडा सत्याग्रह सुरु झाला. तो १२ सप्टेंबर १९४८ पर्यंत चालू होता. सरकारने स्वामीजींना अटक केलीच तर त्यांच्या पश्चात सत्याग्रह चालू राहावा यासाठी पुढील कृति समिती स्थापन केली होती.

१) अध्यक्ष - दिगंबरराव बिंदू - भोकर
२) सदस्य - १. जे.के. प्राणेशाचार्य
२. गोविंददास श्रॉफ - औरंगाबाद
३. जमलापुरम केशवराव[७]

४. डॉ. जी.एस. मेलकोटे[८]

वरील कृति समितीने सरकारने स्वामीजींना अटक केल्यानंतर हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाचे नेतृत्व केले. स्टेट काँग्रेसने राज्यातील जनतेला झेंडा सत्याग्रह करण्याचे आदेश दिले. हा सत्याग्रह ७ ऑगस्ट १९४७ रोजी सुरु झाला. राज्यात भारतीय ध्वज फडकावणे, ध्वज हातात घेऊन प्रभात फेऱ्या काढणे, सभा आयोजित करणे व तिरंगा ध्वज फडकावून त्यास सलामी देण्याचे कार्यक्रम करावेत असे स्टेट काँग्रेसने जनतेला आवाहन केले. या आवाहनाला जनतेने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. निजाम सरकारची बंदी असूनही मराठवाड्यात १०४६ पेक्षा अधिक गावात झेंडा सत्याग्रह करण्यात आले. अशावेळी सत्याग्रहींनी पोलीस व रझाकारांच्या अन्याय व अत्याचारांची पर्वा केली नाही. कंधार येथे ७ ऑगस्ट १९४७ रोजी रामदासराव कोळनुरकर यांच्या नेतृत्वाखाली झेंडा सत्याग्रह करण्यात आला. त्यांच्यासोबत २२ सत्याग्रही होते. यामध्ये दत्तात्रय रंगनाथ बिडवई, नागोराव कोळनुरकर, गुरुनाथराव कुरुडे, पंढरीनाथराव कुरुडे, रामराव पवार, अनंत मामडे, राजाराम मामडे, प्रल्हाद अनावडे, माणिकराव काळे, गुरुराव वडवळकर, गणपतराव मोरे, नळगे माधवराव, उध्दवराव श्रीनिवास, गोविंदराव मोरे, बंडू झटू, नागनाथ टेकाळे, मारोतराव बोड्डावार, नारायणराव कुरुडे, शंकरराव टेळकीकर, रघुनाथ रावजी हंबर्डे, माणिकराव पवार, राजेश्वर शिराढोणकर व जयवंतराव कुरुडे[९] यांचा समावेश होतो. २९ ऑगस्ट १९४८ रोजी कंधार येथे तहसिल कचेरीवर एका राष्ट्रीय स्वातंत्र्यवादी तुकडीने माणिक काळे यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा ध्वज फडकाविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा रझाकारी पोलिसांनी त्यांना गोळ्या घालून ठार केले. ते वीर हुतात्मे झाले.

**जंगल सत्याग्रह :**

हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कृति समितीने राज्यातील जनतेला ऑगस्ट १९४७ रोजी खेड्यापाड्यातून जंगल सत्याग्रह करण्याचा आदेश दिला. त्यानुसार जनतेने ऑगस्ट १९४७ पासूनच जंगल सत्याग्रह सुरु केला. यामध्ये साग, मोह, ताडी व शिंदीची झाडे तोडण्याचा निर्णय घेण्यात आला. ही झाडे तोडयासाठी सरकारची बंदी होती. तसेच तो कायद्यानुसार गुन्हा होता. ताडीची लाखो झाडे राज्यात होती. तसेच प्रत्येक ताडीच्या झाडाचे जंगल होते. अशी झाडे तोडून जंगल साफ करणे असे जंगल सत्याग्रहाचे स्वरुप होते. स्टेट काँग्रसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ यांनी कायदेभंग करुन जंगल सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. हा जंगल सत्याग्रह ऑगस्ट १९४७ पासून सप्टेंबर १९४८ पर्यंत चालू होता. हा सत्याग्रह हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाचाच एक भाग होता.

**जंगल सत्याग्रहाची उद्दिष्टचे :**

१) राज्यात ताडीच्या झाडाची लागवड करण्यात आली होती. तसेच प्रत्येक गावात ताडीची जंगल होते. याच जंगलात मोह व शिंदीचीही झाडे होती. ही झाडे तोडणे हा कायद्यानुसार गुन्हा समजला जात असे. कारण अशी झाडे तोडण्यास कायद्यानुसार बंदी होती. अशी झाडे तोडून कायदेभंग करणे हा जंगल सत्याग्रहाचा हेतू होता. निजामाच्या आदेशाचे उल्लंघन करणे.

२) हैदराबाद राज्य भारतीय संघराज्यात विलीन करणे. निजामाची जुलमी सत्ता उखडून टाकणे.

३) निजामाचे पोलीस आणि रझाकार शिंदी पिऊन त्या धुंदीमध्ये जनतेला व शेतकऱ्यांना विनाकारण मारहाण करीत.

४) ताडी, शिंदी व मोह या झाडाच्या लिलावापोटी निजाम सरकारला अबकारी कराच्या स्वरुपात बराच महसूल मिळत असे. साधारणपणे वर्षाला १,७८,५७,९०४ रुपये महसूलाच्या रुपाने सरकारला मिळत असत. हा महसुल बंद व्हावा.[१०]

५) निजामाची सत्ता उलथून टाकण्यासाठी निजाम सरकारवर दडपण आणणे.[११]

६) निजामाचे आर्थिक नुकसान करणे.[१२]

७) गोरगरीब सामान्य लोकांना शेतीसाठी जमीन उपलब्ध करणे.[१३]

८) निजाम सरकारच्या अन्याय, अत्याचार आणि दडपशाहीला विरोध करणे.[१४]

ऑगस्ट १९४७ पासून सप्टेबर १९४८ पर्यंत हैदराबाद राज्यात जंगल सत्याग्रह चालू होता. याकाळात २३ लाख शिंदीची झाडे तोडण्यात आली. मराठवाड्यात ३५ ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. त्यामध्ये १,२२,६०० शिंदी, मोह, ताड व सागाची झाडे तोडण्यात आली. कायदेभंगाच्या म्हणजे झेंडा व जंगल सत्याग्रहात राज्यातील दहा हजार लोकांना निजाम सरकारने अटक केली होती. त्यापैकी मराठवाड्यातील अटक झालेल्या सत्याग्रहींची संख्या ५५८८ होती.[१५] जंगल सत्याग्रहात प्रामुख्याने दलित स्त्री पुरुषांनी सहभाग घेतला. झाडे तोडणे व लाकडे फोडणे ही दलितांची पारंपारिक कामे होती. त्यामुळे त्यांना जंगल सत्याग्रह करणे कठीण नव्हते. स्टेट काँग्रेसच्या लोकांनी केवळ नेतृत्व आणि मार्गदर्शन केले. त्यांच्याच आदेशानुसार दलितांनी जंगल तोडून साफ केले. दलितांच्या बरोबर इतर जातीचेही लोक व शेतकरीही सहभागी झालेले होते. जंगल सत्याग्रहात प्रामुख्याने शिंदीचीच झाडे तोडण्यात आली. कंधार तालुक्यात टेळकी येथे सामुहीक जंगल सत्याग्रह करण्यात आला. तसेच वैयक्तिक पातळीवर स्वातंत्र्य सैनिकांनी ठिकठिकाणी शिंदीची झाडे तोडून सरकारचे आर्थिक नुकसान केले. झरिबा वाघमारे, सताजी वाघमारे, रामराव पवार, कोंडिबा कांबळे, मल्हारी सोनकांबळे, गुंडाजी सोनकांबळे यांनी बाचोटी, उमरज व कल्हाळी परिसरात शिंदीचे गोबे फोडणे, शिंदीची नासधूस करणे, शिंदीची मडकी फोडणे[१६] ही सरकार विरोधी कामे केली.

**भुमिगत कार्य :**

हैदराबाद स्टेट काँग्रेसने इ.स. १९४७ मध्ये झेंडा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह आणि सरहद्दीवर लष्करी कॅम्प्स उभारुन निजाम सरकारच्या विरोधात सशस्त्र लढे सुरु केले. त्यामुळे राज्यातील वातावरण तप्त झाले. अशावेळी निजाम सरकारच्या विरोधात उघडपणे कार्य करणे कठीण झाले. त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांनी भुमिगत राहून सरकारच्या विरोधात लढा दिला. रामराव नामदेव पवार यांनीही भुमिगत राहून सरकारच्या विरोधात लढा दिला. त्यांनी स्वातंत्र्य सैनिकांना गुप्त माहिती पुरविण्याचे कार्य केले.

**हैदराबाद राज्याला स्वातंत्र्य प्राप्ती - १९४८:**

हैदराबाद राज्यातील जनतेने सुरु केलेले सशस्त्र आंदोलन आणि निजामाचे पोलिस व रझाकार हे जनतेवर करीत असलेल्या अन्याय अत्याचारावर भारत सरकार लक्ष ठेवून होते. निजाम मीर उस्मान अलीखान हे भारतीय संघराज्यात आपले राज्य विलीन करण्यास तयार होत नसल्यामुळे आणि त्यासाठी केलेले सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यामुळे भारत सरकारला १३ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद राज्यावर पोलिस कारवाई करावी लागली. या घटनेस ऑपरेशन पोलो असेही म्हणतात. वास्तविक पाहाता भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई केली होती. परंतु लष्करी कारवाई असे म्हटल्यास कायदेशीर आंतरराष्ट्रीय प्रश्न निर्माण होईल. म्हणून या कारवाईस कायदेमंत्री डॉ. भीमराव रामजी उर्फ बाबासाहेब आंबेडकरांनी पोलिस अॅक्शन असे नाव देण्याचे भारत सरकारला सुचविले. कारण पोलिस अॅक्शन या शब्दामुळे हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणाचा प्रश्न हा भारताचा अंतर्गत प्रश्न ठरणार होता. स्वामीजी व दिगंबरराव बिंदू यांनी पंडित नेहरु, महात्मा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्याशी चर्चा करुन हैदराबाद राज्याचया विलीनीकरणासाठी भारत सरकारने पोलिस कारवाई करावी अशी त्यांना विनंती केली होती. त्यानुसार भारत सरकारने लोकहितासाठी या राज्यावर अॅक्शन घेण्याचे ठरविले. १३ सप्टेंबर १९४८ रोजी पहाटे चार वाजता पोलिस कारवाई[१७] सुरु झाली. त्याच दिवशी स्टेट कॉंग्रेसच्या कृति समितीने नागपूरला बैठक घेऊन या बैठकीत निजामाला पदच्यूत करण्याची मागणी करणारा ठराव पास केला होता.

हैदराबाद राज्यावरील पोलिस कारवाईचे प्रमुख संचालक लेफ्टनंट जनरल महाराज राजेंद्र सिंहजी, सदर्न कमांड होते. या कारवाईचे नियंत्रण, नियमन व मार्गदर्शन त्यांनीच केले. हैदराबाद राज्यात एकाचवेळी पाच दिशेने भारतीय लष्कराने प्रवेश करुन कारवाई सुरु केली. लष्कराची विभागणी पाच भागात करण्यात आली होती. राजेंद्र सिंहजी यांच्या मदतीला पुढील लष्करी अधिकारी होते. प्रत्येकाकडे एका स्वतंत्र विभागाचे नेतृत्व दिले होते.

१) मेजर जनरल जयंतीनाथ चौधरी - सोलापूरहून प्रवेश करणाऱ्या सशस्त्र दलाचे कमांडर
२) मेजर जनरल डी.एस. ब्रार - सोलापूरच्या उत्तरेस मुंबई विभागातील दलाचे कमांडर
३) ब्रिगेडियर शिवदत्त सिंग - मध्यप्रांत व वऱ्हाडकडचे कमांडर.
४) मेजर जनरल ए.ए. सुंद्रा - मद्रास समितीचे कमांडर
५) एअर व्हाईस मार्शल मुखर्जी - संपूर्ण हवाई हालचालीचे व कृतीचे नियंत्रक

निजामाने आपल्या लष्कराची विभागणी चार गटात केली होती. प्रत्येक गटाचा प्रमुख व त्याचयाकडे असलेल्या विभागाची माहिती पुढील प्रमाणे त्यांच्याकडे-

**१) उत्तर विभाग :**

या विभागाचे प्रमुख कमांडर ब्रिगेडियर तौफिक अली होते. या विभागात औरंगाबाद, परभणी, नांदेड, आदिलाबाद व निजामाबाद या जिल्ह्याचा समावेश होता.

**२) पूर्व विभाग :**

या विभागाचे प्रमुख ब्रिगेडिअर महंमद हुसेन खान होते. या विभागात नलगोंडा, वरंगल व कारीमनगर जिल्ह्याचा समावेश होता.

**३) दक्षिण विभाग :**

या विभागाचे प्रमुख लेफ्टनंट कर्नल अली अहमद होते. या विभागात गुलबर्गा, रायचूर व महबूबनगर या जिल्ह्याचा समावेश होतो.

**४) पश्चिम विभाग :**

या विभागाचे प्रमुख ब्रिगेडियर सईदी हमीब अहमद असून या विभागात बीदर, उस्मानाबाद व बीड जिल्ह्याचा समावेश होता.

अशा रितीने भारतीय लष्करांनी पाच भिन्न दिशेने ( वायव्येस औरंगाबाद, पश्चिमेला सोलापूर, ईशान्येला आदिलाबाद, दक्षिणेस कर्नूल व आग्नेयेस विजयवाडा ) हैदराबाद राज्यात प्रवेश करुन निजामी पोलिस व रझाकारांशी लढाई सुरु केली. सुरुवातीला रझाकारांनी चांगला प्रतिकार केला. परंतु नंतर मात्र त्यांचा भारतीय लष्करापुढे निभाव लागला नाही. १७ सप्टेंबरला सायंकाळी पाच वाजता निजाम मीर उस्मानअली खान बहादूर यांनी हैदराबाद रेडिओ स्टेशनवर भाषण केले व आपण युध्द थांबवित असल्याची घोषणा केली. यानंतर हैदराबाद लष्कराचे प्रमुख जनरल अलुइद्रूस यांनी हैदराबाद शरण येत असल्याचे जाहिर केले. त्याच दिवशी हैदराबादचे पंतप्रधान मीर लायक अली यांनी नभोवाणीवरुन भाषण केले आणि आपल्या मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला. अशाप्रकारे केवळ १०९ तासात पोलिस कारवाई यशस्वी झाली. हैदराबाद राज्य स्वतंत्र झाले. अर्थात ते भारतात विलीन झाले. निजामाने शरणागती पत्करताच स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली. यानंतर जनरल चौधरींनी हैदराबाद राज्याचा राज्यकारभार ताब्यात घेतला. ते १४ महिने तेथील लष्करी प्रशासक होते. १ डिसेंबर १९४९ रोजी त्यांच्या जागी नागरी प्रशासक म्हणून एम.के. वेलोडी आले. जे.एन. चौधरी यांच्या लष्करी प्रशासनात डी.एस. बखले. डी.आर. प्रधान, नबाब झैन यार जंग आणि राजा धुंडीराज यांचा समावेश होता. जयती नाथ चौधरी यांनी राज्यात कायदा व सुव्यवस्था निर्माण केली.

**निष्कर्ष :**

१. रामराव पवार यांनी हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात भुमिगत राहून कार्य केले.
२) रामराव पवार यांनी स्वातंत्र्य सैनिकांना गुप्त माहिती पुरविण्याचे कार्य केले.
३) रामराव पवार यांनी झेंडा सत्याग्रहात सहभाग नोंदविला.
४) रामराव पवार यांनी जंगल सत्याग्रहात शिंदीची मडके फोडण्याचे व शिंदीचे गोबे फोडण्याचे काम केले.
५) हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली झालेल्या सत्याग्रहात रामराव पवार यांनी सहभाग घेतला.

**संदर्भ सूची :**

१. भालेराव अनंत, हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मुंबई, मौज प्रकाशन गृह, २००१, पृ ८.
२. देऊळगावकर वि.पा. ( अनुवादक ), स्वामी रामानंद तीर्थ - हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९७६, पृ. ७७.
३. देऊळगावकर वि.पां. ( संपा.), स्वामी रामानंद तीर्थ यांची दैनंदिनी, मुंबई, म.रा.सा आणि सं. मंडळ २००१, पृ.२२.
४. देऊळगावकर वि.पां. ( संपा.), पूर्वोक्त, पृ. २४.
५. देऊळगावकर वि.पां. ( संपा.), पूर्वोक्त, पृ. १८६.

६. भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ. ८९.
७. देऊळगावकर वि.पां. ( संपा.), पूर्वोक्त, पृ. १८४.
८. देऊळगावकर वि.पां. ( संपा.), पूर्वोक्त, पृ. २५.
९. पवार रामराव नामदेव, कंधार यांची प्रत्यक्ष मुलाखत, दि. १ नोव्हेंबर २०१६.
१०. Dhengle B.S., Hyderabad Freedom Struggle, Nanded, Kalpana Prakashan, १९९८, p. १९६.
११. माळवदकर त्र्यंबकराव सखाराम, औराद शहाजनी, ता. निलंगा प्रत्यक्ष मुलाखत, दि. १९ नोव्हेंबर २००१.
१२. चौधरी वसंत, चारठाणा, ता. जिंतूर, प्रत्यक्ष मुलाखत, दि. १० डिसेंबर २००१.
१३. कित्ता.
१४. देहरे रामनाथ किसनराव, ता. जिंतूर प्रत्यक्ष मुलाखत, दि. २५ डिसेंबर २००१.
१५. कठारे अनिल, मराठवाड्याचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१३, पृ.१८८.
१६. पवार रामराव नामदेव, पूर्वोक्त.
१७. देऊळगावकर वि.पां. ( संपा.), पूर्वोक्त, पृ. २६.